**५ /३ /२३**

**विषय : संस्थे च्या पुनर्निर्माण प्रक्रियेत शॉर्ट लिस्ट केलेल्या विकसकांचे सादरीकरण.**

दिनांक ४/३/२३ रोजी पत्रकार नगर च्या पुनर्निर्माण प्रॉजेक्ट ची पुढील वाटचाली संबंधात संस्थे ची पंच समिती आणि ह्या प्रॉजेक्ट चे आपले सल्लागार श्री हर्षल कवडिकर आणि सौ. किरण काबरा यांची एक मीटिंग संस्थेच्या मधुकर जोशी सभागृहात श्री विजय सावंत यांच्या अघ्यक्षते खाली झाली. बाहेर गावी असल्याने पंच समिती सदस्य श्री राजाराम जोशी आणि श्रीमती ऋता बावडेकर सभे ला उपस्थित नव्हते.

सर्व प्रथम सचिव श्री पटवर्धन यांनी ह्या मीटिंग चा एजेंडा तसेच शॉर्ट लिस्ट केलेले ७ विकसकांचे प्रेझेन्टेशन जवळ पास १० दिवस पुढे कां ढकलण्यात आले त्याची कारणें सांगितली. आता हे सादरीकरण १४ आणि १५ मार्च ला भांडारकर रोड येथील पी व्ह्याय सी क्लब येथे होणार असून यांनी विकसकांच्या सादरीकरणाचा ठरलेला क्रम पण सांगितला. श्री कवडिकर यांनी त्यांना विकसकांनी प्रेझेन्टेशन च्या अंदर्भात विचारलेले प्रश्न आणि त्यांनी दिलेली उत्तरं ह्याची माहिती सभे ला दिली.

विकसकांच्या सादरीकरण करण्याचा क्रम खालील प्रमाणे असेल.
दिनांक १४ /३ /२३
वेळ: दुपारी १२ ते संध्याकाळी ५ पर्यंत. प्रत्येकी १ तास.
१. कोहिनूर डेव्हलपर
२. नायाती डेव्हलपर
३. जोशी हुबळीकर
४. रावेतकर
दिनांक: १५ / ३ / २३
वेळ: दुपारी १२ ते संध्याकाळी ४ वाजे पर्यंत.
१. मेजेस्टीक लेंडमार्क
२. प्रिस्टीन डेव्हलपर
३. वेंकटेश

मीटिंग मधे असे ही ठरवण्यात आले की श्री कवडिकर सर्व प्रेझेन्टेशन चे संयोजन करतील ज्याने प्रत्येक विकसकाचे सादरीकरण पाऊण तासात होऊ शकेल

आणि शेवटचे १० / १५ मिनिट प्रश्नोत्तरा साठी मिळू शकतील.

ह्या सादरीकरणा ला संस्थे चे, पंच समिती सदस्य सोडून, इतर १७ सभासद / सह सभासदांना ही आमंत्रित करण्यात येणार आहे. ही यादी पंच समिती च्या १ / ३ / २३ च्या सभेत ठरवण्यात आली आहे. सचिव त्यांना ह्या संबंधात सूचित करतील.

विकसकांना सादरीकरणा च्या कार्यक्रम ची सूचना श्री कवडिकर ६ / ३ / २३ ला करतील तसेच ते दिलेल्या वेळे
प्रमाणे PYC ला येतील ह्याचे ही नियोजन करतील.

आमंत्रित केलेल्या संस्थे च्या सभासदांना विकसक निवडीची प्रक्रिया कशी आहे आणि आत्ता पर्यंत झालेल्या कामाचे स्वरूप कळावे तसेच त्यांच्या माहिती आणि अनुभवा चा लाभ ह्या प्रॉजेक्ट मधे कसा होऊ शकतो हे सांगता यावे म्हणून त्यांची एक मीटिंग १२ / ३ / २३ रोजी संध्याकाळी ६ वाजता आपल्या सभागृहात पंच समिती सदस्यांन सोबत घेण्याचे ठरवण्यात आले.

ह्या आमंत्रित सभासदांनी आणि पंच समिती सदस्यांनी त्यांचे, झालेल्या प्रेझेन्टेशन संबंधी चे, अभिप्राय २० / ३ / २३ रोजी होणाऱ्या मीटिंग मधे मांडायचे आहेत ज्यात सर्वोत्तम ३ बिल्डर्स ची निवड करायची आहे.

ह्याच काळात संस्थे च्या सर्व सभासदांची त्यांना मिळणाऱ्या जागे संबंधी wish list काय आहे हे पंच समिती सदस्य प्रत्येक सदस्याला भेटून जाणून घेतील ज्याने करून ती माहिती निवडलेल्या ३ बिल्डर्स ला देता येईल.

१४ आणि १५ तारखेच्या सादरीकरणास आमंत्रित सभासद / सह सभासद.
१. श्री गणेश शिरोडे
२. श्री शशांक गोखले
३. सौ. रंजना माकोडे
४. श्री अनिरुद्ध अंगळ
५. श्री अरविंद करंदीकर
६. श्री निवास  गाडगीळ
७. श्री वैशाल नाईक
८. श्री रोहन मोरे
९. श्री अभिजीत वारघडे
१०. श्री अनिल टाकळकर

११. श्री वसंत जोगदेव
१२. श्री राजेश शाह
१३. श्री यशवंत केंजले
१४. श्री अशोक बुधकर
१५. श्री संजय नानकर
१६. श्री महेश प्रभू देसाई
१७. सौ. यशोदा वाकणकर

ह्या नंतर अध्यक्ष श्री सावंत यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याची घोषणा केली.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती च्या वती ने.**